# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. ३३०** **दिनांक २३/११/२०२१**

## ऑनलाईन वेश्या व्यवसायावर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक २२/११/२०२१ रोजी वपोनि. श्री पाटील यांना गुप्त बातमीदारामार्फत अशी बातमी मिळाली की, भाईंदर पूर्व परिसरात राहणारी महिला ही ऑनलाईन जाहिरातीद्वारे वेश्या व्यवसायासाठी मिरा-भाईन्दर परिसरातील लॉजमध्ये किंवा गिऱ्हाईकास लॉज मध्ये रुम बुक करावयास लावून किंवा गिऱ्हाईकाचे सोयीनुसार शॉर्ट टाईमसाठी ७,०००/- रु वेश्यागमनाचा मोबदला घेवून गिऱ्हाईकास मुली पुरविते.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. एस. एस. पाटील यांनी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना मनमंदिरा स्वीट समोर, सिने मॅक्सचौक, कनकिया रोड, मिरारोड पूर्व या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह १४.०५ वा. छापा टाकला असता महिला वेश्यादलाल हिने वेश्यागमनाच्या मोबदल्यात पैसे स्विकारुन पुरुष ग्राहाकांना मुली पुरवित असतांना मिळुन आल्याने वेश्यागमनाकरीता स्विकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०२ पिडित मुलींची सुटका करण्यात आली. सदर बाबत पोहवा. २२६९ उमेश हरी पाटील यांचे फिर्यादीवरुन महिला आरोपी व पाहिजे आरोपी रवि साहू रा. नायगाव यांच्या विरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ४००/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७०, ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उपआयुक्त (गुन्हे), श्रीमती पदमजा बडे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्री. संपतराव पाटील, पो.हवा./२२६९ उमेश पाटील, पोहवा/२२९८ विजय निलंगे, पोशि/३६६० केशव शिंदे, मपोशि/१०७८ सुप्रिया तिवले, मपोशि/१७९६ सुनिता आवताडे- भरोसा सेल, चालक पोना/२६३८ गावडे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

---ooo---